**नियमित दिवाणी दावा क्रमांक १९०/२०१३ मधील नि. क्र. १०० ड वरील आदेश**

१. प्रतिवादी क्र. १३ यांनी सदरचा अर्ज विना उलटतपासाचा आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, प्रस्तुतचे काम वादी साक्षीदार क्र.१ चा उलटतपास प्रतिवादी नं.१३ यांनी करणेवर नेमले होते. परंतु प्रतिवादी नं १३ ही वयस्कर असून वयोमानाने ती आजारी असलेने तिला मे.कोर्टानी नेमले तारखेस हजर राहता आले नाही अथवा वकीलांना प्रस्तुत कामासंदर्भाची माहिती व काही महत्वाचे कागद उलटतपासासाठी आवश्यक असलेने ते प्राप्त झाले नव्हते. त्यामुळे प्रतिवादी नं.१३ हिस वादी तर्फे साक्षीदार नं.१ यांचा उलटतपास घेता आला नाही. प्रतिवादी नं.१३ हिने वादी नं. १ यांचा उलटतपास घेणेस जाणुनबुजून टाळाटाळ केलेली नाही.

३. सदरचा वाद हा स्थावर मिळकतीसंदर्भात असलेने गुणदोषावर काम चालणे आवश्यक व गरजेचे आहे. तसे न झालेस दावेचे कामी गुंतागुंत निर्माण होणार. तसेच प्रतिवादी यांना वादीचा उलट तपास घेणेस परवानगी नाकारलेस त्याचे कायदेशिर न्यायहक्कास बाधा पोहचणार असून कायदेशिर गुंता वाढून न्यायप्रक्रिया बिकट व अवघड होणार आहे. याउलट प्रतिवादी यांना उलटतपास घेणेस परवानगी दिलेस न्यायदान सुलभ होणेस मदत होणार आहे. प्रतिवादी यांना उलटतपास घेणेस परवानगी दिलेस वादीचे काही एक नुकसान होणार नाही. वादी यांचे असे कथन आहे की,अर्जातील मजकूर चूकीचा व खोटा आहे. त्याबाबत योग्य कारण नमुद नाही. प्रतिवादी नं १३ हे आजारी नाहीत.

४. दोन्ही बाजुंच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूंच्या विधीज्ञांनी अर्ज व म्हणण्याच्या मजकुराप्रमाणे युक्तीवाद केला आहे.

५. अभिलेखावरील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले. वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादी यांच्या विरुध्द हक्कज्ञापनासाठी, वाटपासाठी व कायम

मनाई ताकीदीकरीता दाखल केला आहे. वादी यांनी आपले सरतपासाचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्र. १०० वर दाखल केलेले आहे. त्यानंतर सदर प्रतिवादी यांचे विरुध्द ''उलटतपास नाहीचा'' आदेश पारीत झालेला आहे. त्यानंतर प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. वादी यांनी सदरचा दावा स्थावर मिळकतीबाबत दाखल केला असल्यामुळे प्रतिवादी यांना पुरावा करण्याची संधी देणे नैसर्गिक न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. प्रतिवादी यांचे विरुध्द झालेला ''उलटतपास नाहीचा'' आदेश रद्द न केलेस त्यांना न्याय्य हक्कापासून वंचित राहावे लागणार आहे. प्रतिवादी यांच्या कथनावर अविश्वास ठेवणेसारखी परिस्थिती अभिलेखावर आलेली नाही. सबब दावा स्थावर मिळकतीबाबत असलेने व प्रतिवादी यांचे अर्जातील कथनाचा विचार करता त्यांचे विरुध्द झालेला ''उलटतपास नाहीचा'' आदेश रद्द करून त्यांना वादीचा उलटतपास घेणेस परवानगी देणे न्यायोचीत होणार आहे. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश करत आहे.

**आ दे श**

अर्ज मंजूर करणेत येतो.

Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2026.03.25 11:22:31 +0530

ठिकाण — गडहिंग्लज.
दिनांक — २१/०२/२०२६

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
गडहिंग्लज.